Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850


Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 9 | Oct - 2015

# मातंग समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीचे अध्ययन.

**संकेत सुरेशराव काळे**
**पीएच्. डी. संशोधक , जे. जे. टी. विद्यापिठ, झुंझुनु, राजस्थान.**

### प्रस्तावना -

जात ही संल्पना अंत्यत पुरातन जरी असली तरी तिला प्रखर रूप हे मनुराज्यामध्ये प्राप्त झाले आहे. आणि मनुराज्यामध्ये जात ही विभागल्या जाऊन चातुवर्ण अस्तीत्वात आला. आणि त्यांच्या कर्तव्याप्रमाणे त्यांची जातीमध्ये विभागणी करण्यात आली.




चातुवर्णामधील सर्वांत शेवटचा घटक म्हणजे शुद्र आणि शुद्राचे आधुनिकीकरण म्हणजे अनुसुचीत जाती/जनजाती, अनुसुचीत जातीमधील मांतग हा एक समाज घटक आहे.

मातंग जातीची निर्मिती ही जातुवर्णाची देण आहे आणि मातंग समाज अनुराज्यामध्ये आखुन दिलेली कार्य हे आपले पिढयानं पिढया चालत आणि परंपरागत व्यवसाय समजुन आजही बाधीलकीतील व्यवसाय करीत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील मागासलेपणा आणि स्वत:ला मध्यप्रवाहामध्ये वाहुन न घेतल्यामुळे त्यांचा सामाजीक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास गोठला आहे. शिक्षण हे ज्याप्रमाणे माणसाला चळवत शिकविते नेमके त्याच गोष्टीपासून हा समाज आलीप्त आहे आणि लादुन रूढीगत परंपरा वाहुन नेण्यातवच ते धन्यता मानीत आहे.

मातंग शिक्षीत समाज हा सुध्दा समाजाला दिशाहीन समाजाला बनवीत आहे. ससमाजापासून प्रथक राहणे त्याचप्रमाणे समाजातील नेतृत्व करणारे सुध्दा चिंतनशिल नसल्यामुळे ते आपल्या समाजाची विकसनशिल दिशा ठरविण्या असमर्थ ठरित आहेत.

संशोधनामध्ये आढळणारी एकमेव बाब म्हणजे अशिक्षीतपणा त्यामुळे त्याचा आर्थिक व सामाजिक दर्जा खुंटला आहे ज्याच्या मुळे जीवनमानाचा दर्जा वाढतो.

### अनुसुचित जातीचा अर्थ व परिभाषा :

भारत देशातील जातीव्यवस्थेचा अभ्यास केल्यानंतर असे निर्दशनास येते की वेदीक काळापासुन तर व्यवस्था प्रत्येक माणसाच्या म-नामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या अनुभवास येत आहे.

जातीव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या जातीची विभागणी केली असली तरी त्यामध्ये ज्या जातीस समाजाने निर्बंध लावले होते ती जात म्हणजे अतीशुद्र.

अतिशुद्र जातीचा अभ्यास करीत असतांना अनेक विद्वानांनी यांच्या वेगवेगळया व्याख्या केल्या आहेत.

### जि.ए. मुजुमदार :

अस्पृश्य जाती म्हणजे अशा जाती की ज्यांना सामाजीक व राजकीय दृष्टया "अयोग्य मानले जाते त्यांच्यावर उच्च वर्गाने परंपरागत अनेक निर्बंध लावले आहेत."

### जि.एस.धुर्वे :

"यांच मते अनुसुचित जाती म्हणजे असे समुह की ज्याचा समावेश घटकाच्या अनुसुचित जातीच्या यादित केला आहे."

**लासनाथ शर्मा :**

"अस्पृश्य जाती म्हणजे अशा जाती की ज्याच्या स्पर्शाने अन्य व्यक्ती अपवित्र होते असे मानले जाते आणि त्या व्यक्तीला प्रवित्र होण्यास काही प्रायश्चित विधी करावे लागतात."

अनुसुचित जातीचा अभ्यास करीत असतांना जो समाज सांस्कृतीक दृष्टया अजुनही मागागसलेला आहे समाज म्हणजे मातंग समाज.

हया समाजाला अभ्यास करतांना असे दिसुन येते की, एकेकाळी हया समाजातील स्त्री ही ग्रामीण भागामध्ये एकप्रकारे डॉक्टरणीचा व्यवसाय करायची. अशिक्षीत समाजामध्ये परंपरागत व्यवसाय म्हणजे ग्रामीण भागातील स्त्रियांचे बाळंतपण व हयाकरीता मातंग समाजातील स्त्री एकटी तज्ञ महिला इतर समाजाध्ये नव्हती तसेच मातंग समाजातील लोक ग्रामीण व शहरी लोंकाकरीता आवश्यक असलेल्या वस्तु, सुप, फडे, दवडया इ. उद्योग करणारे परंतु आज या समाजाची अवस्था पाहिली असता असे दिसून येते की अनुसुचित जातीमधील ज्या जाती आहेत त्यामध्ये हा समाज प्रामुख्याने महाराष्ट्रात इतर अनुसुचित जातीपेक्षा अजुनही मोठया प्रमाणात अशिक्षीत, आर्थिक दृष्टया शैक्षणिक दृष्टया व राजकीय दृष्टया कमजोर आहे.

लोकशाही प्रदान देशामध्ये अनुसुचित जाती जमातीच्या लोकांना त्यांची आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक दृष्टया उन्नती होण्याचे दृष्टीने त्याचे हक्क संरक्षीत करण्यात आले आहेत.

भारताला स्वंतत्र मिळुन ६५ वर्ष पूर्ण झाली असतांना देखील मातंग समाज हा मागासलेला का हया बाबतचा सर्वकष विचार करतांना हया बाबतची नेमकी कारणे काय हयाचा विचार करून हया समाजामधील उणीवा कोणत्या हयाबाबत अध्ययन करण्यासाठी अकोला अंतर्गत येणाऱ्या मलकापुर क्षेत्राची निवड करण्यात आली.

**मातंग समाजाचा इतिहास :**

मांग ही एक भारतातील अस्पृश्य जात असुन तिचा दर्जा अत्यंत कमी प्रतीचा मानला गेला पण मागं समाजाचे सांस्कृतीक महत्त्व जास्त आहे. कारण पुर्वी पासुन मानवाला जीवन उपयोगी वस्तुचा पुरवठा हे मागं लोक करीत असत उदा. फळे, सुप, मांग समाजाच्या स्त्रिया त्या काळी दायीची कामे करीत असत म्हणून हया मांग जातीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. म्हणून हया मांग जाती विषयी माहिती जाणुन घ्यावयाची असल्यास मग ती सामाजिक, धार्मिक आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक गोष्टीचा अभ्यास करावयाचा असल्यास त्या समाजाची ऐतिहासीक पार्श्वभुमी पाहणे महत्वाचे आहे.

मांग समाज आज खालच्या दर्जाचा गणल्या जातो. तरी तो समाजात अपमानास्पद जीवन जगत आहे पण पुर्वी मांग जात ही राज्य कर्ती जमात होती. ज्या 'मनुरम्हती' ने चांडाळाचे कुत्रा मांजरा सारखे वर्णन केले हत्याच काळात मांतगाचे राज्य होते.

मांतग समाजाच्या आठ राज्याचा उल्लेख ललित विस्तारात आहे. त्याची नावे अशी.

१) मगध राकुळ, २) कोशल राजकुळ, ३) वैशातील राजकुळ, ४) वंश राजकुळ, ५) अवंती राजकुळ, ६) कुरू राजकुळ, ७) मैथली राजकुळ.

खेडे गावात मांग लोक सुवर्णास "हायाज" मायबाप असे म्हणतात तर सुवर्ण मांगास 'राजकरा' असे म्हणतात हया नमस्काराच्या प्रथेवरून मांगाची पुर्वे राज्य असावी असे वाटते. बंगाल मधील '-नमोशुद्रा' ही जात चाण्डाल वशांची आहे. त्यामुळे नामशुद्र ही जात पुर्वी बौध्द धर्मानुयानी असुन त्याने राज्य वैभव भोगले असावे. गौतम बुध्दाच्या काळात कोशल देशाचा राजा सम्राट 'प्रसेनजीत' हा जातीने मांग होता. चालुक्य वंशातील पहीला राजा 'जयसिंग' त्यानंतर राजा रणराग सत्येवर आला त्याची राजधानी विजापुर जिल्हयातील 'पातापी' सध्याचे 'बदामी' शहर होते. तो इ.स. ५६७ च्या सुमारास मुत्यू पावला. या नंतर मांगाचे राज्य बळकावलेला 'मांगलीश' हा गादेवर आला. कारण त्या कालखंडाची नोंद ५६७ ते ६१० अशी आहे. या वरुन पुर्वी मांगाचे राज्य होती असे वाटते. संदर्भ शिला लेख बदामी येथील माकुटेश्वराच्या देवळाजवळ पडलेला जयस्तंभा प्रमाणे मांग या शब्दाचे सांस्कृतिक रूप मातंग असे आहे. पण हा मुळचा शब्द मॉग, मांग किंवा मंग अस असावा त्याला इतिहासीक आधार आहे.

वि.रा. शिंदे यांच्या मते मॉग, मंग, मांग हे शब्द एक सारखे आहेत. संस्कृत मध्ये मातंग या शब्दाचा अर्थ हत्ती किंवा सर्प असा होतो. परंतु हत्ती किंवा सर्प मांतगाचे पुर्वज होवू शकत नाही. तर मांग या शब्दाचा अर्थ वानर असा होतो. द्रविडी शब्द आहे. म्हणून मांग हा शब्द मंग या शब्दापासून आलेला असावा आणि मांग हे वानराचे वंशज असावे कारण मांगाची पहिली वसाहत ही कन्नड भाषा बोलणाऱ्या कर्नाटकात झाली. किसकीदा हे त्यांचे राज्य हे तुंगभद्रा नदिच्या काठावर होते.

यावरुन असे समजते की, पुर्वी या मातंग समाजाची राज्य होती.

**प्राचीन मांगाची स्थिती :**

रामायण महाभारतात या काळात मांतग ऋषी होवून गेला. त्याची कथा महाभारतात आहे. ब्राम्हण मिळवावे म्हणून त्याने शंभर वर्ण एका पायावर उभाराहुन घोर तपश्चर्या केली तो अत्यंत हुशार होता त्याचा आश्रम 'पंप' सरावराच्या तीरावर होता हे सरोवर सध्याच्या मैसूर

राज्यातील वेहलीर जिल्हयात आहे. त्या काळातील प्रसिध्द ब्रम्हचारिणी शबरी, जटीला, तापसी, या मांतग ऋषीच्या शिष्या होत्या त्यांनी मातंग गुरू जवळ शिक्षण घेतले म्हणून रामायणाने त्याचा तिरस्कार केला.

बुध्दाच्या काळात 'भिक्टक' संघात सर्वच जातीच्या लोकांना प्रवेश होता. भिक्टक संघात चाण्डाल कुलीन अनेक भिक्षु होते. त्यातील 'सोपा' हा होय. सोपाक मातंग समाजाचा होता. पाली साहीत्यातील सुत्तनिक्षात्तात चाण्डाल युवकासंबंधी तीन गाथा आहेत. बौध्द धर्माप्रमाणे जैन धर्मात मांगाचे प्रसिध्द भिकक्षुक होवून गेले 'हरीशबल'हा एक होय.

**मातंग समाजातील विवाह प्रथा :**

मातंग समाजातील विवाह प्रथेस थोडा फरक आहे. मातंग समाजात समान पोट जातीत विवाह होत नाही. मामे बहीणीशी लग्न होते. वधु वर एका ठिकाणी शेजारी शेजारी उभे करतात. त्यांच्या भोवती पाच वेळा सुत्र वेष्ठन करतात त्या सुत्राचे दोन तुके करून त्यात हळकुंड बांधुन त्याची त्या दोघांच्या हातात काकन बांधतात नंतर वधु वरांना गावातील लोकांच्या घरी नेवून आणतात अशा प्रकारे लग्न समारंभ संपतो लग्नात वधुपिता वराला सोन्याची किंवा चांदिची अंगठी किंवा गाय सप्रेम भेट देतो.

**तमाशा :**

तमाशा या नाटय प्रकारात मांग समाजाचे फार मोठे योगदान आहे. त्याला इतिहास आधार शाहीर अन्नाभाउ साठे, पठ्ठेबापूराव हे मांग समाजातील होते. प्राचीन धार्मिक विधीत काव्य, गायन, संगीत, नुत्य मिळुन एकच कला मानली जाई. हे कलावत खालच्या जातीतील आहे. मनुस्मृतीतील मांगाला 'वे' म्हटले आहे व 'वाध्य' वाजविणे हा त्यांचा धंदा सांगितला आहे. पुर्वी पासून मांग समाजाने गाणे, तामाशा, शाहीर, संगीत यांत प्राविण्य मिळविले आहे.

'विझाबाई भाऊ मांग नारायणगावकर' या तमाश्यात राष्ट्रपती पारितोषीक मिळाले असे अने मांग लोकाचे महाराष्ट्रात तमाशे होते. तमाश्याच्या माध्यमातुन मांग समाजाने समाज प्रबोधनाचे कार्य केले. आजही भाऊ बापु मांग तमाशा मनोरंजनाचे कार्य करीत आहे. त्या तमाशाच्या मालक 'आनंदराव महाजन' हे मातंग समाजाचे आहेत.

**मातंग समाजाचे सांस्कृतीक सामाजिक जीवन :**

भारतीय सांस्कृतीक मांगाचे खुपच महत्त्व आहे. सामाजिक कार्यात मांग उपस्थित असल्याशिवाय त्यापुर्ण होऊ शकत नाही अशी सामाजिक प्रथा आहे.

मांग या कानडी शब्दाचा अर्थ 'लमी' असा होतो. म्हणून चांगल्या कामाला जातांना वाटैत मांग भेटला तर शुभ म्हणतात. काही ठिकाणी चांगल्या कामाची सुरूवात मांच्या हातुन करतात. पेरणीच्यावेळी मांगीनची ओटी भरण्याची प्रथा काही ठिकाणी आढळते शेतातील पोठाची रास करते वेळी खळे तयार करण्यापासून रास घरात येई पर्यंत मांग खळयात असावा अशी काही शेतकऱ्यांची भावना असते मांगणी पुर्वी काळापासून ईश्वरी देन, बाळतपण करण्याचे काम करीत आल्या आहेत. आज ही दवाखाण्यात आधुनिक सामुग्री असतांना बाळातीनी जवळ मांगीन ठेवण्याचा व तिच्या हस्ते बाळांतपण करण्याची प्रथा रुढ आहे. बाळतीनीच्या राहवासाने हया स्त्रीया हया कामात परीपुर्ण झाल्या आहेत. बाळांतपण हे काम घरीचे असते असे म्हणतात. ते करण्यास कोणी सहसा तयार होत नाही. त्यामुळे हे ाम मांग जातीतील स्त्रिया करीत होत्या.

**उद्देश :**

१) मातंग समाजाच्या वैयक्तीक व कौटुबिक स्थितीचे अध्ययन करणे.
२) समाजिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.
३) मातंग समाजाच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.
४) मातंग समाजाच्या समस्याचा अभ्यास करणे.
५) मातंग समाजाच्या सामाजिक प्रतिष्ठेचा अभ्यास करणे.
६) मातंग समाजाच्या सामाजिक प्रतिष्ठेचा अभ्यास करणे.
७) समाजात असलेल्या अंधश्रध्देचा अभ्यास करणे.
८) शासनाच्या समाजाकरीता असलेल्या योजनाच्या माहितीचा अभ्यास करणे.
९) समाज शासनाच्या योजनाच्या किती उपयोग होतो याबाबत अभ्यास करणे.

**उपकल्पना :**

१) मातंग समाजाच्या सामाजिक दर्जा हिन आहे.

२) मातंग समाजाची आर्थिक स्थिती हलाखीची आहे.
३) मातंग समाजाची कोटुंबिक दर्जा निम्न स्वरूपाचा आहे.
४) मातंग समाजाचा पारंपारिक व्यवसायाचा ऱ्हास होत आहे.
५) मातंग समाजाला शासनाच्या ज्या विकासात्मक योजना आहे त्याचा फायदा होत नाही.
६) मातंग समाजात अंधश्रध्येचे प्रमाण विपुल प्रमाणात आहे.

**नमुना निवड :**

संशोधन कर्त्यांनी संभाव्यता नमुना निवडीचा वापर केला. साधा यादृच्छीक पध्दतीतील लॉटरी पध्दतीचा उपयोग नमुना निवडीसाठी करण्यात आला.

**तथ्य संकलन :**

तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतातील मुलाखत अनुसुची व निरिक्षण तंत्राचा तसेच दुय्यम स्त्रोतामधील पुस्तके, वर्तमानपत्रे, इ. समावेश करण्यात आला.

**निष्कर्ष :**

१) मातंग समाजाचा अभ्या केला असता सर्वच उत्तर दाते हे हिन्दु धर्माचे आहे.
२) मातंग समाजाचा अभ्यास केला असता सर्व उत्तरदात्यांची भाषा मराठी असल्याचे आढळते.
३) सर्वधर्म समभावबद्दल अभ्यास केला असता सव्र उत्तरदात्यांनी त्यांच्या वसतीमध्ये सर्व धर्माचे लोक वास्तवय करतात.
४) पिण्याच्या पाण्याच्या समस्येविषयी अभ्यास केला असता. सर्वच उत्तरदात्यांनी त्यांच्या वसतीमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असल्याचे सांगितले.
५) मातंग समाजाचा अध्दश्रेदधेविषयी अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते देव-देवतांची पुजा करणारे आढळले.
६) मातंग समाजाचा सणा विषयीचा अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते हिंदु पध्दतीचे सर्वच सण साजरे करतात.
७) मातंग समाजाच्या विवाह पध्दतीचा अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते पारंपारीक विवाह पध्दत सांगणारे आहेत.
८) मातंग समाजाच्या विवाह पध्दतीचा अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते विधवा विवाहास मान्यता आहे असे सांगणारे आहेत.
९) मांतग समाजाच्या विवाह पध्दतीचा अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते मातंग समाजात पुर्नविवाह पध्दत असल्याचे सांगितले.
१०) मातंग समाजाच्या वास्तव्या संबंधीचा अभ्यास केला असता सर्वच उत्तरदाते हे स्थायी स्वरूपाचे वास्तव्य करणारे आहेत.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१) वाघमारे प्रकाश -अनुसुचित जाती-जमाती मधील मातंग समाजाच्या आर्थिक सामाजिक स्थितीचे अध्ययन, प्रबंध, १९९५-९६.
२) प्रा. घाटोळ रा.ना. -सामाजिक संशोधन तत्त्व व पध्दती प्रकाशन-श्री. मंगेश प्रकाशन, २३१ नवी रामदासपेठ, नागपुर.
३) प्रा. घाटोक रा.ना. -ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास प्रकाशन.
४) सुरडकर विशाल - बंजारा समाजातील लोंकाच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचे अध्ययन. प्रबंध २००१-०२.
५) लोटे रा.ज. - भारतीय सामाजिक समस्या प्रकाशन क्र. ९६, जुले १९९९.
६) प्रा. सोंमवशी, महार मांग संबंध.



**संकेत सुरेशराव काळे**
**पीएच्. डी. संशोधक , जे. जे. टी. विद्यापिठ, झुंझुनु, राजस्थान.**